पोलीस आयुक्तालय,अमरावती
दिनांक १४.११.२०२१

## — प्रेस नोट —

दिनांक १२.११.२०२१ रोजी रझा अकादमी, या इस्लामिक संघटनेच्यावतीने त्रिपुरा येथे अल्पसंख्याक समाजावर झालेल्या हल्ल्याचे निषेधार्थ राज्यव्यापी बंद पुकारण्यात आला होता. त्याअनुषंगाने, मा.जिल्हाधिकारी कार्यालय अमरावती येथे धरणे निदर्शने व निवेदन देणेकरीता विना—परवाना मोर्चा काढण्यात आला होता. जिल्हाधिकारी, अमरावती यांना निवेदन दिलेनंतर परत जातेवेळी काही मोर्चकरी यांनी अमरावती बाजारपेठेतील व्यापारी प्रतिष्ठांनावर दगडफेक केली.यामुळे, व्यापारी वर्गामध्ये मोठया प्रमाणात असंतोष निर्माण झाला. त्याअनुषंगाने, दगडफेक व तोडफोड केल्याने रु. ५ लाख १५ हजार इतक्या मालमत्तेचे नुकसान केल्याने एकुण ८३६४ आरोपी विरूध्द एकुण ११ गुन्हे दाखल करण्यात आले. असुन ९ आरोपीतांना अटक करण्यात आली व इतर आरोपीतांना अटक करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

दिनांक १३.११.२०२१ रोजी सकाळी ०९.३० वा. राजकमल चौक येथे भारतीय जनता पार्टी, ईतर संघटनांचे पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी १६.०० वा. पर्यत व्यापा—यांना बाजारपेठ बंद ठेवण्याची विंनती करण्याकरीता व दिनांक १२.११.२०२१ रोजी घडलेल्या घटनेचा निषेध करण्याकरीता एकत्रित झाले. पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी घोषणाबाजी करुन निषेध व्यक्त केला व घोषणबाजी सुरु केल्या नंतर. अचानक काही वेळाने कार्यकर्त्याचा जमाव अनियंत्रित व उग्र होवून दुकानांवर दगडफेक करुन तोडफोड केली. व दुकानांना / वाहनांना आग लावुन नुकसान केले. अनियंत्रित जमावाने कोंणत्याही प्रकारचे नुकसान करु नये यासाठी त्यांचा पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी पाठलाग करुन त्यांना त्याठिकाणावरुन हुसकावून लावले. काही ठिकाणी दोन गटाचे नागरीक एकमेकासमोर आल्याने तेथील तणावपुर्ण स्थिती उपस्थित अधिकारी व अंमलदार यांनी कौशल्याने हाताळुन परिस्थिती नियंत्रणात आणली व कोणतीही अप्रिय घटना घडू दिली नाही. शहरातील विविध भागात तुरळक घटना घडत असतांना त्याठिकाणी, राखीव पोलीस अधिकारी व अंमलदार यांना पाठवून शांतता प्रस्थपित करण्यात आली. तसेच जमावाकडून झालेल्या दगडफेक, जाळपोळ व तोडफोडीच्या घटनेमुळे झालेल्या शासकीय व खाजगी मालमत्तेच्या संदर्भाने ६३०९ आरोपीविरुध्द विविध पो.ठाणेमध्ये एकुण १५ गुन्हे दाखल करण्यात आलेले असुन पैकी ५३ आरोपीना अटक करण्यात आली व इतर आरोपीतांना अटक करण्याची प्रक्रिया सुरू आहे.व त्यांचे कडुन शस्त्र जप्त करण्यात आले आहेत.

**Amravati Band 2021**

15/11/2021
01/58
SB

सदर दगडफेकीच्या घटनेमध्ये ०१ पोलीस अधिकारी ०८ पोलीस अंमलदार जखमी झाले. जमाव नियंत्रित करण्यासाठी व परिस्थिती आटोक्यात आणणेसाठी मा.पोलीस आयुक्त यांचे आदेशाने संपुर्ण अमरावती शहरात कलम १४४ (१) (२) (३) जा.फौ. प्रमाणे संचारबंदी लागू करण्यात आली तसेच चुकीचे संदेश किंवा व्हीडीओ प्रसारित होवू नये याकरीता अमरावती शहर कार्यक्षेत्रातील इंटरनेट सेवा ३ दिवसाकरीता बंद करण्यात आली.सदर घटनेसंबधाने पोलीसांनी कसोशीने प्रयत्न करुन सार्वजनिक / शासकीय मोठया प्रमाणात मालमत्तेची हानी व कोणत्याही प्रकारची जिवितहानी होवू दिली नाही.

आज दिनांक १४.११.२०२१ रोजी मा.पोलीस आयुक्त डॉ आरती सिंह यांनी सर्व सुत्र आपले हातात घेवुन अधिनस्त अधिकारी व अंमलदार यांना परिस्थीतीवर नियत्रंण ठेवण्याकरीता मार्गदर्शक सुचना केल्या. तसेच दाखल गुन्हयासंबंधाने स्वतंत्र तपास पथके व आरोपी अटक पथके नेमण्यात आली.

शहरात सार्वजनिक शांतंता व सुव्यवस्था अबाधित राहावी व नागरीकांना भयमुक्त वातावरण निर्माण करण्याकरीता संवेदनशिल भागात मा. अपर पोलीस महासंचालक (का.व सु) महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे मार्गदर्शनाखाली व उपस्थितीत रूट मार्च घेण्यात आला रूट मार्च मध्ये स्वत: मा. पोलीस आयुक्त डॉ. आरती सिंह यांचेसह RCP, QRT , SRPF Platoon तसेच, ३५ पोलीस अधिकारी व ५०३ अंमलदार व दंगा नियंत्रण पथकाचे वज्र व वरुण वाहनसुध्दा सहभागी करण्यात आले होते. त्यावेळी, मा. पोलीस आयुक्त डॉ. आरती सिंह यांनी नागरिकांना अफवा व खोटया बातम्यांवर विश्वास न ठेवणेबाबत आवाहन केले.

कार्यालय पोलीस आयुक्त अमरावती

पोलीस निरीक्षक
विशेष शाखा,अमरावती शहर

**Amravati Band 2021**

Scanned with CamScanner